# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड** **दिनांक २१/०७/२०१८**

## १) घरफोडी :-

**अ) इतवारा :-** दिनांक १९.०७.२०१८ रोजी चे २१.३० ते दि.२०.०७.२०१८ चे ०५.०० वा.चे दरम्यान फिर्यादीचे कापड दुकानात रंनजितसिंग मार्केट समोर नांदेड येथे यातील फिर्यादीचे कापड दुकानात कुणीतरी अज्ञात चोरटयानी चौथ्या मजल्यावरील फायबर ची सीट तोडुन आत प्रवेश करुन गणेश फॅब्रीक व रीदी सीदी हुजेरी रेडीमेट यांचे गल्यातील नगदी १,४१,१००/-रुपये चोरुन नेले. वगैर **फिर्यादी सीद्राम मारोती वंगलवार, वय ५७ वर्षे व्यवसाय व्यापार रा. विसावा नगर नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे.इतवारा** गुरनं. २३३/२०१८ कलम ४५७, ३८० , भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/ एन. पी. सोळूंके, मो.नं.९५५२२८५९००** हे करीत आहेत.

## २) विवाहितेचा छळ :-

**अ) हिमायतनगर :-** दिनांक २६.०३.२०१८ ते आज पावेतो वेळ नकी नाही मौ. सिरंजनी ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे यातील फिर्यादी बाईस नमुद आरोपीतांनी संगणमत करुन तु तुझ्या माहेरहुन वडीला कडुन ननंद स्वाती आनंत कागंळे हिचे बाळांत पणासाठी १,००,०००/-रुपये घेवुन ये म्हणुन फिर्यादीस शिवीगाळ करुन लाथा बुक्याने मारहाण करुन शारीरीक व मानसिक त्रास देवुन घराबाहेर हाकलुन दिले. व नंदवई आनंत कागंळे यांनी तु पोलीसात तक्रार का दिली म्हणुन धमकी दिली. वगैरे **२४ वर्षीय वय असलेल्या महिला फिर्यादीने** दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे. हिमायतनगर** गुरनं. ७७/२०१८ कलम ४९८(अ), ३२३, ५०४, ५०६, ३४ भादविप्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोउपनि/परदेशी, मो.क्र. ७०८३३३७६९४** हे करीत आहेत.

**ब) भोकर :-** सन-२०१७ पासुन आरोपीच्या घरी मौजे. पिंपळकौठा मगरे ता. भोकर जि. नांदेड येथे यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करुन माहेरहुन पैसे आण म्हणुन शारीरीक व मानसिक त्रास देवुन मारहाण करुन जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे ३५ **वर्षीय वय असलेल्या महिला फिर्यादीने** दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे. भोकर** गुरनं. २०२/२०१८ कलम ४९८(अ), ३२३, ५०४, ५०६, ३४ भादविप्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोहेकॉ/२१४९ कऱ्हाळे, मो.क्र.९६२३६५६२३०** हे करीत आहेत.

## ३) फसवणुक :-

**किनवट :-** दिनांक सन २००४ ते सन २००९ दरम्यान वेळ नकी नाही एकात्मीक अदीवासी प्रकल्प किनवट जि. नांदेड येथे यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करुन शासकिय अधिकारी म्हणुन कार्यरत असतांना त्यांनी आदिवासी साठी असलेले एच. डी. पी. पाईप पुरवठा योजना, साकल पुरवठा योजना, कन्यादान योजना, शेळी गट वाटप योजना, कन्यादान योजना विद्युतीकरण योजनेचा मोठया प्रमाणावर भृष्टाचार करुन संबधीत लाभार्थी यांना योजनेचा फायदा न पोहचता सदर योजनेतील ३३,७५,७२०/-रुपयाचा अपहार केल्याचा मा. न्यायमुर्ती श्री. गायकवाड कमिशनने काडल्याने सदर प्रकरणी गुन्हा दाखल. वगैरे **फिर्यादी छंदक गोविंदराव लोखंडे, वय ४५ वर्षे व्यवसाय नौकरी प्राथमीक शायक प्रकल्प अधिकारी एकात्मीक आदीवासी प्रकल्प कार्यालय पांढरकौवडा ता. केळापुर जि. यवतमाळ रा. केलासनगर नवासारी आमरावती** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे. किनवट** गुरनं १६८/२०१८ कलम ४२०, ४०९, ३४ भादवी अन्वये गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/अनिल कांबळे, मो.क्रं. ९०९६२५४३५८** हे करीत आहेत.

## ४) कल्याण नावाचा मटका खेळत असतांना मिळुण आले :-

**अ) मुखेड :-** दिनांक २०.०७.२०१८ रोजी चे १५.१५ वा. चे सुमारास जांब ते मुखेड जानारे रोडवर विजय क्लॉथ सेंटर समोर रोडवर, ता. मुखेड जि. नांदेड येथे यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या लोकांनकडुन पैसे घेवुन स्वतःचे फायदयासाठी कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी १,१७०/- रुपयाचे मालासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/६५७ मधुकर पंढरीनाथ जायभाये, पो. स्टे. मुखेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. मुखेड** गुरन. २१५/२०१८ कलम १२ (अ) मजुका अन्वये गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/६५७ जायभाये, मो.क्र. ८९७५८४११२२** हे करीत आहेत.

**ब)मरखेल :-** दिनांक २०.०७.२०१८ चे १६.०८ वा. चे सुमारास हाणेगाव शिवार ता. देगलुर जि. नांदेड येथे यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या लोकांनकडुन पैसे घेवुन स्वतःचे फायदयासाठी कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी ४,४००/- रुपयाचे मालासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/२५०५ प्रभाकर संभाजी कदम, पो. स्टे. मरखेल** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. मरखेल** गुरन. ११८/२०१८ कलम १२ (अ) मजुका अन्वये गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/१५८३ देशमुख, मो.क्र. ९६०४३३३६९९** हे करीत आहेत.

**क) भाग्यनगर :-** दिनांक २०.०७.२०१८ चे २०.१० वा. चे सुमारास तात्या कॉम्पलेक्स तरोडा नाका नांदेड येथे यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या लोकांनकडुन पैसे घेवुन स्वतःचे फायदयासाठी मुंबई नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी ३,१६०/- रुपयाचे मालासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/१९३२ मोहमद जाकेर मो. कासीम पो. स्टे. भाग्यनगर** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. भाग्यनगर** गुरन. २२८/२०१८ कलम १२ (अ) मजुका अन्वये गुन्हा दाखल असुन **तपास पोना/०६ एम. जी. हंबर्डे, मो.क्र. ९८८१०२८३००** हे करीत आहेत.

**ड) इतवारा :-** दिनांक २०.०७.२०१८ चे ०२.१० वा. चे सुमारास साईनगर मॅफकोच्या मोकळया जागेवर नांदेड येथे यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या लोकांनकडुन पैसे घेवुन स्वतःचे फायदयासाठी तिर्रट नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी १२,८३०/- रुपयाचे मालासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/नंदकीशोर पंडीतराव सोळंके, पो. स्टे. इतवारा** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. इतवारा** गुरन. २३२/२०१८ कलम १२ (अ) मजुका अन्वये गुन्हा दाखल असुन **तपास पोना/१४२१ मांडवकर, मो.क्र. ९४२१७६९८६५** हे करीत आहेत.

**इ) भोकर :-** दिनांक २०.०७.२०१८ चे १८.५० वा. चे सुमारास बिलालनगर रोडवरील संगम फंक्शन हॉलच्या छतावर भोकर जि. नांदेड येथे यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या जना मना (मांगपता) जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी २,२००/- रुपयाचे मालासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोना/२१३८ संजय भुजंगराव शिंदे, पो. स्टे. भोकर** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. भोकर** गुरन. २०४/२०१८ कलम १२ (अ) मजुका अन्वये गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/१७९१ राठोड, मो.क्र. ९४२३६१८७१६** हे करीत आहेत.

## ५) विहीरीत पडुन पाण्यात बुडून मृत्यु :-

**तामसा :-** दिनांक २०.०७.२०१८ चे १४.४५ सुमारास मौ. पिंपळगांव शिवार ता. हदगांव जि.नांदेड येथे यातील **मयत नामे सौ. माया भ्र. अमोल वाघमारे, वय १९ वर्षे रा. पिंपळगाव ता. हदगांव जि. नांदेड** ही शेतीमधील विहीरीवर पाणी काढण्यसाठी गेली असता ती पाय घसरुन विहिरीत पडुन पाण्यात बुडून मरण पावली. **खबर देणार संतोष परसराम आडे, वय ४२ वर्षे रा. पिंपळगाव ता. हदगांव जि. नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. तामसा** आ.मृ १७/२०१८ कलम १७४ सिआरपीसी प्रमाणे आ.म्र. दाखल असुन **तपास सपोउपनि/ शिवाजी महाजन तोंडेवार, मो.क्र. ७३९७८०८२८०** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड
फोन नंबर ०२४६२-२४४४७४.

## **प्रेस नोट** दि.२१.०७.२०१८

## जबरी चोरी करणारी टोळी स्थानिक गून्हेकडून अटक

दि.२०.०७.२०१८ रोजी स्थानिक गून्हे शाखा नांदेड येथे गूप्तबातमीदारकडून गोपनीय माहीती मिळाली की, अंदाजे पाच महीन्यांपूर्वी पो. स्टे. उस्माननगर हददीतील कापसी रोडवर माधव पवार रा. भूकमारी ता. कंधार व त्याच्या साथीदारांनी एका मोटार सायकलवरून जाणा-या नवरा-बायकोला आडवून महीलेच्या अंगावरील दागिने, नगदी पैसे चाकूचा धाक दाखवून, मारहाण करून घेतले आहेत. त्यावरून सदर आरोपीचे शोधकामी स्थानिक गून्हे शाखा नांदेड येथील स. पो. नि. भारती व स्टाफ यांचे पथक तयार करून, सदर आरोपीचा व त्याचे साथीदारांचा शोध घेतला असता, सदर आरोपी व त्याचे दोन साथीदार आरोपी मिळून आल्याने त्यांना त्याब्यात घेऊन, विचारपूस केली असता, त्यांनी मूदखेड, उस्माननगर, भाग्यनगर, सिडको, नांदेड-लोहा रोड, नायगाव परीसरात १६ ठिकांणाहून मोटार सायकल स्वारांना आडवून, चाकूचा धाक दाखवून त्यांचेजवळील नगदी रूपये, सोन्याचे दागिने, मोबाईल जबरीने चोरून घेतले असल्याचे सांगितले. तसेच त्यांनी एमजीएम कॉलेज येथून एक पल्सर मोटार सायकल व संजीवनी हॉस्पिटल येथून एक डिस्कव्हर मोटार सायकल चोरली असल्याचे सांगितले आहे. सदर आरोपीकडून सोन्याचे दागिने, दोन चोरीच्या मोटार सायकल असा एकूण एक लाख रूपयाचा मूददेमाल रूपयाचा मूददेमाल जप्त करण्यात आला आहे. १) पो. स्टे. उस्माननगर नांदेड गूरनं १९/१८ कलम ३९४, ३४ भादंवि २) पो. स्टे. मूदखेड गूरनं २८/१८ कलम ३९२, ३४ भादंवि ३) पो. स्टे. विमानतळ नांदेड गूरनं ३३१/१७ कलम ३७९ भादंवि ४) पो. स्टे. शिवाजीनगर नांदेड गूरनं २५९/१७ कलम ३७९ भादंवि उघडकीस आले आहेत. सदर आरोपीतांना पूढील कार्यवाहीस्तव मूददेमालासह पो. स्टे. उस्मानगनर यांच्या ताब्यात दिले आहे. सदर आरोपीतांना मोरक्या माधव पवार हा सराईत गून्हेगार असून, त्याचेविरूध्द बीड, पूणे येथे गून्हे दाखल असून, तो गँग तयार करून रोड रॉबरी व वाहन चोरी करण्याच्या सवईचा आहे. त्यांचेकडून आणखी गून्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

सदर कामगिरी श्री चंद्रकिशोर मीणा पोलीस अधीक्षक नांदेड, श्री मंगेश शिंदे अपर पोलीस अधीक्षक नांदेड, श्री राजेंद्र सहाणे पोलीस निरीक्षक स्थानिक गून्हे शाखा नांदेड यांच्या मार्गदर्शनाखाली स. पो. नि. पी. डी. भारती, एएसआय खाडे, पोहेकॉ/वाणी, कूलकर्णी, पोकॉ/शेख जावेद, पोकॉ/व्यंकट गंगूलवार, दादाराव श्रीरामे, गजानन बयनवाड, रवि बाबर, मनोज परदेशी, बालाजी मूंढे यांनी पाडली आहे.

पोलीस निरीक्षक
पोलीस निरीक्षक स्थागूशा नांदेड

# प्रेस नोट

दिनांक २१.०७.२०१८

## पोलीस ठाणे वसंत नगर, पुसद येथील खुनाच्या गुन्हयातील फरार आरोपीस स्थानिक गुन्हे शाखेने केले जेरबंद

.................................................................................................................

मा. पोलीस अधीक्षक श्री चंद्रकिशोर मीना साहेब, मा. अपर पोलीस अधीक्षक नांदेड श्री मंगेश शिंदे साहेब, यांचे आदेशान्वये फरारी आरोपी शोधकामी पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा नांदेड श्री राजेंद सहाणे यांचे मार्गदर्शनाखाली पथकाची स्थापना करण्यात आली होती.

पोलीस निरीक्षक स्था.गु.शा. नांदेड श्री राजेंद्र सहाणे यांचे पथकातील सपोनि श्री विनोद दिघोरे, पोउपनि श्री सदानंद बाबुराव वाघमारे, पोउपनि श्री कल्याण नेहरकर व त्यांचे सोबतचे कर्मचारी यांनी पोलीस ठाणे विमानतळ हद्दीत मालटेकडी कामठा गावाचे ओव्हर ब्रीज जवळ पोलीस ठाणे वसंतनगर, पुसद गु.र.नं. ०५/१७ कलम ३०२, २०१ भा.दं.वि. गुन्ह्यातील फरारी आरोपीस अटक करुन त्याचे ताब्यात एक तलवार व मोटार सायकल क्रमांक एम एच २६–ए वाय– ६११३ जप्त करुन सदर अरोपीवर पोलीस ठाणे विमानतळ गु.र.क्रं. १८०/२०१८ कलम ४/२५ भारतीय हत्यार कयद्याप्रमाणे कार्यवाही करुन अरोपीस पुढील तपास कामी पोलीस ठाणे विमानतळ यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही ही पोलीस निरीक्षक स्था.गु.शा. नांदेड श्री राजेंद्र सहाणे यांचे पथकातील पोउपनि सदानंद बाबुराव वाघमारे, पोउपनि कल्याण नेहरकर, पोहेकॉ जांभळीकर, पोहकॅ माधव केंद्रे, पोना पांगरीकर, पोशि बालाजी सातपुते, पोशि तानाजी येळगे, यांनी केली आहे.

**( राजेंद्र सहाणे )**
पोलीस निरीक्षक स्था.गु.शा. नांदेड